# डॉ.जे.जे.मगदूम फार्मसी कॉलेजचा व्यसनमुक्ती उपक्रमासाठी गौरव




**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :** जयसिंगपूर (ता. शिरोळ) येथील डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजचा महाविद्यालयीन स्तरावर व्यसनमुक्तीचे उपक्रम प्रभावीपणे राबवल्याबद्दल गौरव करण्यात आला.

शिवाजी विध्यापिठांतर्गत नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य (कोल्हापूर जिल्हा), राष्ट्रीय सेवा योजना व लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्यसनमुक्ती विषयक कार्यशाळेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील व राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रणील तोरसकर आणि काशिनाथ हुलवान यांनी विविध उपक्रम, जनजागृती कार्यक्रम, पथनाट्य व्याख्याने व संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नशामुक्तीविषयी जागरूकता निर्माण करण्याचे सातत्यपूर्ण कार्य केले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाढत्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी त्यांनी 'नशाबंदीची शपथ', 'नशाबंदीवरील व्याख्यान व मार्गदर्शन', तसेच व्यसनमुक्तीवरील पोस्टर प्रदर्शन असे विविध प्रेरणादायी उपक्रम राबवले.

शिवाजी विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे मुख्य संघटक/चिटणीस अमोल मडामे व जिल्हा संघटक पुणे विभाग प्रमुख सुरेश सकटे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र व भारतीय संविधानाच्या कलम ४७ ची प्रत देऊन महाविद्यालायचा सन्मान करण्यात आला. तसेच कार्यशाळेत व्यसनांचे दुष्परिणाम, प्रतिबंधात्मक उपाय आणि युवकांमध्ये जनजागृती कशी वाढवावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या गौरवा बद्दल ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस चेअरपर्सन डॉ. सोनाली मगदूम, कार्यकारी संचालक डॉ. सुनिल आडमुठे यांनी महाविद्यालयाचे हार्दिक अभिनंदन केले.